**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग**
**Phone (02362)228608/228847 Email collroffice@gmail.com**
**collddmo.si-mh@nic.in**

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**क्र.जीआव्यप्रा/नैसर्गिक आपत्ती/शाळा सुट्टी आदेश/०७/२०२३** **दि. २०/०७/२०२३**

**वाचले**

(१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९, प्र.क्र.१९९/एसडी-२/, दिनांक ०२/०८/२०१९
(३) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१९९/एसडी-२, दि.२३/१२/२०१९
(४)विभागीय उपसंचालक मुंबई यांचेकडील पत्र क्र.सिउसं/माध्यमिक/संकीर्ण/२०२२/७०७७, दिनांक १३/०७/२०२२
(५) भारतीय हवामान विभाग, मुंबई यांचेकडील पूर्वसूचना दि.२०/०७/२०२३
(६) पाटबंधारे विभागाकडून प्राप्त नदी पाणी पातळी अहवाल

**आदेश**

**ज्याअर्थी** उक्त नमूद अ.क्र.२ अन्वये प्रादेशिक हवामान विभागाच्या पूर्व सुचनेवरून जिल्ह्यातील त्या-त्या भागातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेवून , संपूर्ण जिल्ह्याकरिता अथवा जिल्ह्यातील ठराविक स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत व संदर्भ क्र.२ कडील शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

आणि ज्या अर्थी सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सद्यस्थिती मध्ये अतिवृष्टी होत असून दिनांक २० जुलै रोजी जिल्ह्यासाठी Orange Alert दिलेला असून २१ व २२ जुलै रोजी यलो अलर्ट दिलेला आहे. आतापर्यंतच्या पावसाच्या अंदाजानुसार Orange Alert देखील रेड अलर्ट होवून मोठ्या प्रमाणात पाऊस पडू शकतो. तसेच संदर्भ क्र.(६) अन्वये पाटबंधारे विभागाकडून प्राप्त अहवालानुसार जिल्ह्यातील सर्वच नद्या इशारा पातळीच्या समीप पोहोचलेल्या आहेत. रात्रभर पाऊस सुरु राहिल्यास नद्या धोका पातळी ओलांडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअर्थी , मी के. मंजुलक्ष्मी , जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सिंधुदुर्ग मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व दिनांक ०२/०८/२०१९ च्या शासन परिपत्रकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, सर्व सरकारी व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका शाळा, अनुदानित व विना अनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये व आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था यांना दिनांक **२१/०७/२०२३** रोजी सुट्टी जाहीर करीत आहे.

उक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदरहू आदेश आज दिनांक २०/०७/२०२३ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

(के.मंजुलक्ष्मी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सिंधुदुर्ग**

**प्रत-**

**(१)मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांना माहितीसाठी सादर**
**(२)संचालक, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी**
**(३)जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे उचित प्रसिद्धीसाठी रवाना**
**(४)सर्व संबंधितांस**